**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)**

मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जिल्हा-अहमदनगर, पिन ४२३ १०९.

फोन नं.(०२४२३) २५८५००/२५८७७१/२५८७७२ फॅक्स नं.२५८८७०

(Website - www.sai.org.in ) (E-mail – purchase@sai.org.in)

## ई-निविदा सूचना

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे पाणी पुरवठा विभागाकरीता पाणी शुध्दीकरणासाठी ब्लिचींग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर वार्षिक खरेदीकामी ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

**निविदा किंमत:- रु.३,३००/-, बयाणा रक्कम रु.:- रु.५५,०००/- (अक्षरी रु. पंचावन्न हजार मात्र)**

१. निविदेच्या अटी/शर्ती व ई-निविदा www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२. सदर ई-निविदा ऑनलाईन डाऊनलोडींगसाठी दि.१५/०६/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून ते दि.०३/-०७-/२०१८ सायं ०५.०० वा पर्यंत उपलब्ध राहतील.

३. तांत्रिक लिफाफ्यामध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील निविदेत दिलेला आहे. ती सर्व कागदपत्रे स्कॅन करुन ऑनलाईन निविदेसोबत जोडावीत.

४. निविदा फी व बयाणा रक्कम शासनाचे ई- निविदा पोर्टल www.mahatenders.gov.in येथे online जमा करावी.

५. शक्य झाल्यास तांत्रिक निविदा दि.04/07/2018 उघडण्यात येतील.

कोणतीही निविदा अंशत:/पुर्णत: स्विकारणे अथवा सर्व निविदा नाकारणेचा हक्क संस्थानने राखून ठेवलेला आहे.

**(श्रीमती. रुबल अग्रवाल, भा.प्र.से)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)**
**शिरडी ४२३ १०९.**
**तालुका-राहाता, जिल्हा-अहमदनगर**

दुरध्वनी क्रमांक (९५-२४२३) २५८५००, खरेदी विभाग- २५८७७१, २५८७७२, २५८९४४
फॅक्स क्रमांक +९१-०२४२३-२५८८७०

**मुंबई कार्यालय**-साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, दादर
मुंबई- ४०० ०१४ दूरध्वनी क्रमांक (०२२) २४१६६५५६

# पाणी पुरवठा विभागाकरीता ब्लिचींग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर पुरविणेची ई-निविदा

(कार्यालयीन कामकाजाकरीता)

## श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

## निविदाधारकांसाठी सूचना

०१. ई-निविदेसोबत online सादर करावयाची कागदपत्रे व इतर शर्ती/अटींचा तपशील सोबत दिलेला आहे.

०२. निविदाधारकास साहित्य पुरवावयाची हमी म्हणून रु.५५,०००/- (अक्षरी रु. पंचावन्न हजार) मात्र बयाणा रक्कम व निविदा फी रु. ३,३००/- (अक्षरी रु. तीन हजार तीनशे मात्र) www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर online भरावी लागेल.

०३. निविदा दि.१५ /०६ /२०१८ रोजी सकाळी ११.०० वा.पासून दि.०३ /०७/२०१८ सायं. ०५.०० वा.पर्यंत www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर Downloading व Uploading साठी उपलब्ध राहिल.

०४. Technical Bid मध्ये मागणी केलेली कागदपत्रे स्कॅन करुन ऑनलाईन निविदेसोबत जोडावीत. हार्ड कॉपी मध्ये कागदपत्रे सादर करु नयेत.

०५. शक्य असल्यास तांत्रीक लिफाफे (Technical Bid) दि.०५ /०७/२०१८ रोजी उघडण्यात येतील.

०६. तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरणा-या निविदाधारकांचेच Commercial Bids उघडणेत येईल. त्याची दिनांक व वेळ संबंधीत निविदाधारकांस दूरध्वनीव्दारे कळविण्यात येईल. त्याप्रमाणे याकामी आपण किंवा आपले प्रतिनिधींनी उपस्थित राहावे.

०७. अपुर्ण निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

०८. **निविदेसोबतची पुरवठा करावयाच्या साहित्याची दर भरताना BOQ पाहूनच त्यामध्ये जीएसटी सह सर्व टॅक्सेस,वाराई, हमाली व वाहतूक खर्चासह दर भरावे लागतील याची नोंद घ्यावी.**

०९. कोणतीही निविदा अंशत: किंवा पुर्णत: स्वीकारणे किंवा सर्व निविदा नाकारणेचा हक्क संस्थानने राखुन ठेवला आहे. या बाबतची कारणे देणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.

**(श्रीमती. रुबल अग्रवाल, भा.प्र.से)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)**
**तालुका - राहाता, जिल्हा-अहमदनगर**

## निविदेच्या शर्ती व अटी

१. पुरवठा करावयाचे साहित्याचा अंदाजे तपशील सोबतचे परिशिष्टात दिलेला आहे. त्यास अनुसरुन सदर निविदा ऑनलाईन सादर करावयाची आहे.

२. पुरवठा आदेश दिल्यानंतर प्रत्येक महिन्यास गरजेप्रमाणे सदर मालाची मागणी संस्थानचे पाणी पुरवठा विभागाकडून केली जाईल. त्याप्रमाणे वर्षभर मालाचा पुरवठा करावा लागेल.

३. निविदा फी व बयाणा रक्कम शासनाचे ई- निविदा पोर्टल www.mahatenders.gov.in येथे online भरावी लागेल.

४. साहित्याचे दर हे शिर्डी येथे संस्थानचे भांडार विभागात पोहच व जीएसटीसह सर्व कर समावेशक द्यावेत. साहित्याची पोहोच निविदाधारकाने त्याचे स्वखर्चाने शिरडी येथील संस्थानचे भांडार/पाणी पुरवठा विभागाकडे पॅकींग व फॉरवर्डींगसह दिली पाहिजे. **संस्थानकडून साहित्याची जकात, वाहतुकीचा खर्च वेगळा दिला जाणार नाही. भांडारात साहित्य उतरविण्याची वाराई निविदाधारकास द्यावी लागेल.**

५. कोणतीही निविदा मंजूर/नामंजूर करण्याचा हक्क संस्थानने राखून ठेवलेला आहे. त्याबाबतची कारणे देणे संस्थानवर बंधनकारक असणार नाही.

६. शासनाच्या खरेदी नियमावलीनुसार ज्यांच्या निविदा मंजूर होतील त्यांना विहीत मुदतीत साहित्य पुरवठा करावयाची हमी म्हणून मंजूर पुरवठा आदेशाच्या एकुण किंमतीच्या ३ % इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून ठेवावी लागेल. सदर रकमेचा भरणा निविदा मंजूर झाल्याचे कळविलेनंतर त्वरीत करावा लागेल. **सुरक्षा अनामत रक्कम साहित्याचा पुरवठा पुर्ण केल्यानंतर परत केली जाईल.** सुरक्षा अनामत अगर बयाणा रकमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

७. निविदा मंजूर झाल्याचे कळविलेनंतर त्वरीत शिर्डी येथे समक्ष येऊन, रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर करारनामा नोटरी करुन देणे बंधनकारक राहील. **करारनाम्याची नोटरी फी निविदाधारकास आदा करावी लागेल.**

८. वरील नमूद अ.नं.६ प्रमाणे सुरक्षा अनामत रक्कम जमा करुन व अ.नं.७ प्रमाणे करारनामा करुन दिल्यानंतरच पुरवठा आदेश देण्यात येईल.

९. मागणी केलेले सर्व साहित्य परिशिष्टात दर्शविलेल्या वर्णनाचेच पुरवावे लागेल. पाणी पुरवठा विभागाकडील संबंधीत कर्मचा-यांनी पुरविलेल्या साहित्याची तपासणी केल्यानंतर पुरवठा आदेशाप्रमाणे असल्यासच ते स्विकारले जाईल. वेगळयाच प्रकारचे साहित्य असल्यास ते स्विकारले जाणार नाही व ते स्वखर्चाने तात्काळ परत घेवून जाणे आपलेवर बंधनकारक राहील. ते परत न नेल्यास, त्यांचे नुकसान झाल्यास त्यास संस्थान जबाबदार राहणार नाही.

१०. मंजूर झालेल्या दराने साहित्याचा पुरवठा करणे निविदाधारकांवर बंधनकारक राहील. मंजुर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाववाढ दिली जाणार नाही/ मागता येणार नाही.

११. आलेल्या फेरीक ॲलम व ब्लिचींग पावडरचे नमुने शासकीय अथवा शासन मान्यता प्राप्त प्रयोगशाळेतून तपासणी करुन, तिचा दर्जा व परीमाण योग्य असल्याची खात्री झाल्यावरच बीलाची रक्कम आदा करण्यात येईल. अहवालामध्ये मालाच्या घटकामधील प्रमाण स्टॅण्डर्ड प्रमाणापेक्षा कमी आढळल्यास पाणी पुरवठा विभागामार्फत त्या प्रमाणात दर कमी करण्यात येऊन फेरीक ॲलम व ब्लिचींग पावडरचे बील आदा करण्यात येईल. अथवा बीलाच्या एकूण रकमेच्या २०% रक्कम Pro-Rata बेसिसवर कपात करण्यात येऊन उर्वरीत रक्कम आदा करण्यात येईल. याबाबत निविदाधारकाची कोणतीही तक्रार चालणार नाही. शासन नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व कपाती बिलातून करण्यात येतील.

१२. निविदा कालावधीत व कालावधी संपलेनंतरही नमुद केलेल्या परिमाणापेक्षा २५% जादा साहित्याची मागणी संस्थानकडून झाल्यास जादा साहित्याचा पुरवठा मान्य दरानेच करण्याचे निविदाधारकावर बंधनकारक राहील.

१३. निविदेचा वैधता कालावधी निविदा भरण्याचे अंतीम तारखेपासुन १२० दिवसांचा राहील.

१४. सदरील व्यवहाराबाबत वाद निर्माण झाल्यास तो राहाता/कोपरगाव कोर्टाचे न्यायकक्षेत राहील.

१५. राज्याबाहेरील निविदाधारकाची निविदा मंजूर झाल्यास शासन खरेदी नियमावलीतील नियम क्रं.३.१.२.८ नुसार राज्याबाहेरील पुरवठादार जर न्युनतम असला व महाराष्ट्र राज्यातील पुरवठादार व्दितीय असला तर महाराष्ट्र राज्यातील पुरवठादारांना प्रोत्साहन देण्यासाठी, महाराष्ट्र राज्यातील व्दितीय न्युनतम दरधारक जर न्युनतम दरधारकाच्या दरात माल पुरविण्यास तयार असेल तर एकूण खरेदी करावयाच्या मालाच्या ५०% मालाचा पुरवठा आदेश राज्यातील पुरवठादारांना देण्यात येतील व जर तयार नसतील तर पुर्ण मालाचा पुरवठा आदेश राज्याबाहेरील पुरवठादारांना देण्यात येईल.

१६. निविदेत सहभागी निविदाधारकाने निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्प्यावर निविदेतून माघार घेतल्यास त्यांची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

१७. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करणे वा जादा अटी/शर्ती विहीत करण्याचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. निविदाधारकाची कोणतीही अट/अटी संस्थानवर बंधनकारक राहणार नाही, अशा निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

...३...

**आपत्ती/नैसर्गिक आपत्ती, नुकसान भरपाई व दंडात्मक कारवाईबाबतची तरतूद :-**

१८. साहित्याचा पुरवठा मागणीप्रमाणे न आलेस अथवा योग्य प्रतीचे नसल्यास अगर ठरवून दिलेल्या मुदतीत न झाल्यास संस्थानची अडचण होऊ नये म्हणून व्दितीय, तृतीय न्युनतम दरधारकांकडून अगर इतर पुरवठाधारकांकडून बाजारभावाने आवश्यकतेनुसार साहित्य खरेदी करण्यात येऊन त्यासाठी जादा लागलेल्या फरकाची रक्कम आपले बिलातून अथवा सुरक्षा अनामत रकमेतून वसुल करणेत येईल. त्याबाबत संस्थान व्यवस्थापन अंतिम निर्णय घेईल.

१९. निविदाधारकाने साहित्य पुरवठा करावयाचे नाकारल्यास त्याची पुरवठा न केलेल्या साहित्याची सुरक्षा अनामत रक्कम संस्थान खाती जमा करणेत येईल. तसेच सदर साहित्याचे बाबतीत फेरनिविदा प्रक्रिया करुन साहित्य खरेदी करावे लागल्यास जाहिरात खर्च व प्रक्रियेचा इतर येणारा सर्व समावेशक खर्च मिळून येणारी रक्कम नुकसान भरपाई म्हणून आपणाकडून वसुल केली जाईल.

२०. निविदा कालावधीमध्ये एखादी आपत्ती/नैसर्गिक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी निविदाधारकांच्या नियंत्रनाबाहेर असेल (उदा. आग, महापूर, घातपात, रोगराई, संप, स्फोट, टाळेबंदी, भुकंप वगैरे) व यामुळे पुरवठाधारक मालाचा पुरवठा करु शकला नाही व तसे निविदाधारकाने त्वरीत लेखी कळविले तर याबाबत योग्य तो निर्णय परीस्थितीनुरुप घेण्यात येईल.

२१. साहित्य जर दिलेले मुदतीत पुरविले नाही तर पुरवठा आदेशाचे एकूण किमतीचे १/२ ते १० टक्केपर्यंत दंड आकारण्यात येईल. व सदर दंडाची वसुली आपले बिलातून अगर सुरक्षा अनामतरकमेतून करण्यात येईल.

आ) पुरवठा आदेशातील मालाची किंमत रु.२.०० लाखापेक्षा कमी असल्यास - पुरवठा न केलेल्या मालाच्या किंमतीच्या प्रति आठवडा १/२ % दराने जास्तीत जास्त १० % पर्यंत

ब) पुरवठा आदेशातील मालाची किंमत रु.२.०० लाखापेक्षा जास्त असल्यास - पुरवठा न केलेल्या मालाच्या किंमतीच्या प्रति आठवडा १/२ % दराने जास्तीत जास्त ५ % पर्यंत

(श्रीमती. रुबल अग्रवाल, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

३१/०५

३१/५

दिनांक- ---------------

प्रति,

**मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

शिर्डी, ता.राहाता, जिल्हा-अहमदनगर.

**विषयः- पाणी पुरवठा विभागाकरीता ब्लिचींग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर पुरविणेचे ई-निविदेबाबत...**

महोदय,

खालील सही करणार मी/आम्ही कळवितो की, वरील विषयाबाबत आपण प्रसिद्ध केलेली निविदा वाचली. आपल्या निविदेत नमुद असलेल्या सर्व अटी व शर्ती मी/आम्ही वाचल्या असून मला /आम्हाला मान्य आहेत. आपले अटी/शर्तींचे पालन करणे माझेवर/आमचेवर बंधनकारक राहील.

मी/आम्ही आपणांस निविदेमध्ये नमुद केलेले साहित्य आपल्या मागणीप्रमाणे उपरोक्त कालावधीकरीता संस्थानचे आवश्यकतेनुसार, आवश्यक त्यावेळी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) यांचे भांडार पोहोच करण्याची हमी देतो. सदर मालाचे परिमाण अंदाजे असल्यामुळे वेळ प्रसंगी नमुद केलेल्या परिमाणापेक्षा २५ % पर्यंत जास्त मालाची संस्थानतर्फे मागणी झाल्यास मी/आम्ही तो मंजूर दराने पुरविण्याची हमी देत आहे/आहोत.

ज्या मालाची निविदा मंजूर होईल, त्या मालाचे किंमतीचे ३ % इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून निविदा मंजूर झाल्याचे कळविलेनंतर त्वरीत मी/आम्ही रोख भरणा करुन व नोटराईज्ड करारनामा करुन देऊ आणि त्याप्रमाणे मंजूर दराने साहित्य शिरडी येथील भांडार पोहोच करणे आमचेवर बंधनकारक राहील.

आपला/आपले विश्वासू,

फर्मचे मालकाचे/भागीदाराचे नांव

सही/सहया व शिक्का

(१) -

(२) -

सोबत- कागदपत्रे

## निविदाधारकाबाबत माहिती

१. फर्मचे नांव- ------------------------------------------------------------------

२. पत्रव्यवहारासाठी संपूर्ण पत्ता- ----------------------------------------------

३. दूरध्वनी क्रमांक- --------------------------------------------------------------

ऑफीस- ----------------------------------------------------------------

दुकान- ----------------------------------------------------------------

निवास- ----------------------------------------------------------------

मोबाईल नंबर- -------------------------------------------------------

फॅक्स नंबर- ---------------------------------------------------------

ई -मेल ----------------------------------------------------------------

४. संपर्कासाठी व्यक्तीचे नांव- ---------------------------------------------

दूरध्वनी/मोबाईल क्रमांक- --------------------------------------------

५. मालकाचे/भागीदारांची नावे- १. -----------------------------------------

२. -----------------------------------------

६. निविदाधारकाचे खाते असलेले बॅंकेचे नाव-

अ. शाखेचे नाव

ब. बॅंक अकांऊट नंबर

क. बॅंकेचा IFSC CODE नंबर

निविदाधारकाची सही व शिक्का

**ऑनलाईन <u>निविदेसोबत स्कॅन करुन जोडावयाची कागदपत्रे</u>**

१. अदययावत दुकान नोंदणी दाखला/स्थानिक स्वराज्यसंस्थेचा दाखला

२. जी एस टी नोंदणी क्रंमाक

३. पॅन नोंदणी क्रमांक (पॅन कार्ड)

निविदाधारकाची सही व शिक्का

# पुरवठा करावयाचे साहित्याचा तपशिल

| अ.न. | साहित्याचा तपशिल | मागणी नग | सर्व कर समावेशक दर प्रती मेट्रीक टन/सिलेंडर रु. | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | **ब्लिचींग पावडर** (विक्रम ग्रासिम) ब्रँड, डी.सी.एच.(डी.एस.सी. एल.) आय.एस.आय. मार्क, ३४% क्लोरीन उपलब्ध | ३५ मे. टन | | |
| २. | **फेरिक ॲलम** (१६% ॲलोमिना फेरिक उपलब्ध) | ५५ मे. टन | | |
| ३. | **क्लोरीन गॅस सिलेंडर** (१०० किलो वजन) | ४५ सिलेंडर | | |
| | | | **एकूण रुपये -** | |

(श्रीमती. रुबल अग्रवाल, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी